# १२

## वसईचा वेढा.

---

## पोवाडा.

---

थरकांप सुटे शत्रुला । पाहुन ज्याला । वसईचा किल्ला । ज्यानं सर केला धरून तलवार । फिरंग्यांना ज्यानं दिला बहु मार । चिमाजी धन्य धन्य सरदार ! ।। ध्रु० ।।

—: १ :—

**सिंहांचा** सिंहपणा गेला । भ्याडपणा आला । म्हणून घात झाला । आर्यभूमिला परक्यांचे पाय । लागले, लोक करिती हाय ! हाय ! ! । फिरंग्यांनीं केले कितिक अन्याय ! ।। कोंकणचा प्रान्त जिंकून । किल्ले बांधून । बंदोबस्त करून । फिरंग्यानं मोठा जुलुम केला । हैराण सारा लोक झाला । असा छळ कधीं कुणि न केला ! ।। चाल ।। साष्टी, आगर, वसई

आणि वांद्रे—या गांवचा लोक जुलमानं सारा बाटवला ! ।। तुरुंगांत डांबलं कितिकाला । कितिकानीं अन्नपाण्यावीण प्राण सोडला ।। लोखंडी पत्रा तापवला । अन् त्यावरती कितिक उभा केला ! । तंवा पाय होरपळून गेला ! । असा तडफडून कैक जण मेला । तंवा कोणी विरोध जर केला । तर बांधती त्याला खांबाला । आणि टांचण्या लावती अंगाला । लोखंडी चाप पायाला । डोळ्यात्नं काढती बुबळांला । मग कांपती मुंडकं ते वेळा । इतक्या छळानं जर कोणी नाहीं नमला । तर लावती मशाली अंगाला । अन् उभा जाळती मग त्याला ! ! । ।। चाल ।। हिंदूंचीं देवळं पाडून । त्यावरती चर्च बांधून ।। बाटविले लोक जुलमानं । विहिरीत्नं मास टाकून ! ।। झालं बंद होमहवन । असे लोक केले हैराण ! ।। चाल ।। तंवा हिंदूनीं विचार असा केला । कीं मराठ्यांच्या ध्यावं मदतीला । मग गंगाजी नाईक पाठारे गेले सातार्‍याला ।। अंताजी कावळे देसाई गेले सातार्‍याला ।। अन् बोलले शाहू राजाला । "महाराज ! आलों चरणाला । ऐकावं आमच्या कहाणीला ! फिरंग्यांनीं हिंदुधर्माचा नाश मांडला ! ! ।। त्यांनीं गांवच्या गांव बाटवला । बायकांच्या घेतलं अब्रूला । उभ जाळलं कैक लोकाला । हिंदूंचे वाली तुम्हीं झाला । या जाचात्नं सोडवा आम्हांला । नाहींतर तुम्हीच उडवा मुंडक्याला । आपल्या हातानं मरण





आलं तरी बरं—पण नको त्यांच्या जुलमाला । म्हणून आलों आपल्या चरणाला" ।। चाल ।। शाहूचें हृदय कळवळे । त्यांना मग बोले । "तुम्ही जा सारे । लवकर करूं दुष्टसंहार । फौज मराठ्यांची येईल अनिवार । करूं जुलमाला रणावर ठार" ।। १ ।।

—: २ :—

**रणशिंग** वाजे घनघोर । ऐकुनी वीर । मराठा धीर । पटापट झाला सारा तय्यार । कमरेला जो तो लावी तलवार । सोडुन बायकापोरं घरदार ! ।। फौजेचा मुख्य रणगाजी । होता चिमणाजी । ज्याच्यावर मर्जी । सदा विजयाची, शौर्याचा जाळ । शत्रूला होता रुद्र कळिकाळ ! । सदा कीर्तिनं घातली माळ ! ।। मल्हारराव होळकर । शिंदे, पवार । बाजी भिवराव । रामचंद्र हरी, असे सरदार । विठ्ठल शिवदेव पट्ट्याची धार । धारेनं केले कितिकजण ठार ! ।। ठाण्याच्या किल्ल्यावर हल्ला । जोराचा केला । किल्ला सर झाला । झाला फिरंग्यांचा सेनापति गार । पेड्रो डमेलो झाला रणीं ठार । टोपीवाले झाले कितिक थंडगार ! ।। मग साष्टी, माहिम, बेलापूर । केळवे, मनोर । डहाणू, शिरगांव । तारगोळ—आलीं त्यांच्या कबजांत । तारापुरीं झाला मोठा आकांत ।

कैक रणवीर पडले समरांत ! ॥ चाल ॥ मराठ्यांची फौज झुंजार । किति झाले फिरंगी ठार ॥ लोकांना देइ आधार। मराठ्यांची ढाल तलवार ॥ चाल ॥ फिरंग्यांचा आधार गेला। मराठ्यांनीं मुलुख जिंकला । फिरंग्यांचा नक्षा उतरला । असा सारा मुलुख सर केला । मग एक राहिला वसईचा किल्ला । तिकडं सारा गनिम मग गेला । वसईचा किल्ला असा आहे कीं समुद्राचं पाणी पसरलं दोन बाजूला ! । दलदली जमीन पूर्वेला । म्हणून भय नव्हतं तीनी बाजूला । आणि रेताड मुलुख चवथ्या बाजूला ! । फिरंग्यानीं विचार असा केला । "कीं हा किल्ला खंबीर झाला । इथं राहून करून युद्धाला । मराठ्यांच्या जिरवूं मस्तीला "। असं म्हणून झाला तय्यार युद्ध करण्याला ! ! ॥ जागजागीं शिपाई उभा केला । तोफखाना बुरुजावर ठेवला। दारुगोळा तय्यार केला । इकडं मराठ्यांना कळलं कीं वसईला फिरंगी गेला । तंवा मराठ्यांचा सेनासागर तिकडं चालला ॥ घनघोर संग्राम जो झाला । सांगीन आतां दादानों ! पुढच्या चौकाला ॥ २ ॥

—: ३ :—

**वसईच्या किल्ल्यावर** हल्ला । करण्याला आला ।





मराठा भाला । बंदुका, तोफा आणि तलवार । पट्टे, खंजीर, बर्च्या अनिवार । ज्यांनीं कितिकांना केलं हो ठार ! ॥ माघाच्या शुद्ध दशमीला ! वेढा घातला । वसई किल्ल्याला । तोफांचा मारा सुरू झाला । मराठ्यांनीं हल्ला जबर केला । फिरंग्यांनीं मोठा जोर धरला ! ॥ माणसांचा मोठा बंधारा । घालुन खंद-काला । कोटाला भिडला । मराठा शौर्याचाच अवतार । फिरं-गीहि होता मोठा लढणार । त्यानं तोफांचा केला भडिमार । जणू पसरला अग्निचा जाळ ! ॥ चाल ॥ फिरंग्यांना वाटलं ते वेळा । हा शत्रु जबर बहु झाला । काय होईल ठाव कोणाला ? । म्हणुन मुलं बायका पाठवूं गोव्याला । अजून समुद्रावर जंवर मराठ्यांचा नाहीं जोर झाला । तंवरच पाठवावं बायकापोराला । असा त्यांनीं बेत हो केला । एके दिवशीं मध्यरात्रीला । काळोख फार दाटला । एक नाव आणली ते वेळा । बसविलं बायका-पोराला । अन् चालली नाव गोव्याला ! पण—मराठ्यांनीं पाठलाग केला । आणि आणलं धरुन सगळ्याला ! । त्यामाजी किल्लेदाराची होती सुंदरा ! ॥ छावणींत नेलं मग तिला । मग नावाडी बोलले आप्पाला । "सरकार ! काल रात्रीं एक नाव चालली होती गोव्याला ! । पाठोपाठ हल्ला आम्हीं केला । आणि पकडलं साऱ्या लोकांला । वसईच्या किल्लेदाराची ही हो सुंदरी ॥ कशी आहे पहा गोजिरी । ही पहा ओठाची कळी ।

तारुण्य मुसमुसे उरीं । ही खरी मदनमंजरी । सरकार ! न्यावी ही घरीं " । चिमणाजी आप्पा बोलला । " छट् ! बोलूं नका असल्या गोष्टीला । परनार मातेसम मला । साडी चोळी देऊन हिला । पोंचवा किल्ल्यावर, चला " । चिमणाजी बोलला मग तिला । " बाई ! आईसारखी तूं मला । धर धीर, सोड शंकेला । पोचविन तुझ्या घरीं तुला " । असं म्हणून त्यानं पाठवलं किल्ल्यावर तिला ! ॥ चाल ॥ श्री रामचंद्र जगिं शूर । महारणवीर । तयाहुन शूर । तोच नर ज्यानं जिंकला काम । चिमाजी धन्य ! धन्य ! तव नाम ! ! असे किति वीर जगीं निष्काम ! ॥ ३ ॥

—: ४ :—

**निकराचा** हल्ला चढविला । थडाथडा गोळा । तोफेंतुन गेला । तरी पण किल्ला नाहीं पडला । फिरंग्यांनीं मोठा जोर केला । तीन महिन्यांचा काळ गेला ! ॥ चार पांच धमधमे केले । तय्यार भले । सुरुंग लावले । यत्न पर सारा फुकट गेला । फिरंग्यांनीं वरनं मारा केला । गरनाळा टाकती वरनं गोळा ! ॥ आधणाचं पाणी करून । पन्हाळी लावून । सोडती मग वरनं । खालीं किति लोक भाजला फार ! । जळत्या लांकडांनीं केला संहार । असल्या जाळांत कोण जाणार ! ॥ चाल ॥





तेंवा चिमणाजी अप्पा बोलला । " वीरानों ! लाज आम्हांला । तीन महिने झाले तरी किल्ला नाहीं सर झाला ! । अतिरथी महारथी झाला । पण आज काळिमा आला । तुम्हीं जिंकलं कैक शत्रुला । तुमची कीर्ति गेली मुलखाला । तुमचा धाक नवहि खंडाला ॥ चाल ॥ रणीं तुम्हां पाहून खडे । शत्रूचें क्रूर धडधडे ॥ तुम्हीं पर्वताचे जणु कडे । असं असता झाला माकडें ! ॥ तुम्ही मर्द वीर फांकडे । आज झाला काय तुम्ही रडे ! ॥चला उचला पैजेचे विडे । चला, चढा कोटावर खडे ॥ चाल ॥ जर नसेल शक्य तुम्हांला । तर कांपा माझ्या मुंडक्याला । अन् तोफेच्या बांधा तोंडाला । आणि द्यावी बत्ती तोफेला । अशानं तरी माझं मुंडकं जाऊन पडेल किल्ल्याच्या आंतल्या बाजूला । मरण बरं ! पण दुष्कीर्ति नको ! । मर्दानों ! इज्जत आज जाईल, विचार हा करा " ॥ चाल ॥ आप्पाचं बोलणं जोरानं । हृदयांना गेलं भेदून ॥ आप्पाचे शब्द दारुण । जणु मर्मी लागले बाण ! ! । 'जय महादेव !' गर्जून । चमकले भाले वेगानं ॥ चाल ॥ रणवीर भिडला कोटाला । कोटाचा चिरा फोडला । सुरुंगानीं पाडलं बुरुजाला । खिंडार पडलं कोटाला । अन् मराठ्यांचा लोंढा किल्ल्याच्या आंत चालला ! ! ॥ फिरंग्यांचा जराळ (सेनापति) सिल्वेरा । पुढं आला युद्ध करण्याला । पर घुसला छातितुन भाला । आणि मरुन पडला भूमिला । सिल्वेरा जेव्हां

रणीं मेला । तेव्हां फिरंग्यांनीं पळ काढला ! । शत्रुचा फडशा उडवला । मग जराळ ( सेनापति ) पेरिरा आला शरण ते वेळा ! ! ॥ वसईच्या किल्ल्यावर भगवा झेंडा फडकला ! ! ॥चाल॥ जसं कुरुक्षेत्रीं दारुण । पूर्वी झालं रण । किंवा रामानं । केला लंकेला दैत्यसंहार । तसा वसईला झाला संहार । चिमाजी आप्पा धन्य सरदार ! । शाहीर पांडुरंग गाणार ! ॥ ४ ॥ .

गणेशचतुर्थी, श. १८५५.